## "उपकेंद्र सहाय्यक" पदाकरिता जाहिरात क्र. ०५/२०१९ ची मंडलनिहाय निवड यादी व कागदपत्रे पडताळणी दिनांक ०१-०२/१२/२०२० रोजी आयोजीत केलेबाबत

१) महावितरण कंपनीमध्ये **"उपकेंद्र सहाय्यक"** या संवर्गाची रिक्त पदे भरण्याकरिता तीन वर्षाच्या निश्चित कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने उमेदवारांची निवड करण्याकरिता जाहिरात क्र. ०५/२०१९ ही माहे जुलै २०१९ मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेली होती. जाहिरातीस अनुसरुन ऑनलाईन अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख २६/०७/२०१९ अशी होती.

२) सदर जाहिरातीच्या अनुषंगाने अर्ज प्राप्त झालेल्या उमेदवारांची वस्तुनिष्ठ स्वरुपाची ऑनलाईन क्षमता चाचणी दिनांक २५/०८/२०१९ रोजी घेण्यात आली.

३) उमेदवारांच्या आवेदनाच्या संदर्भात उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने सादर केलेल्या अर्जामधील माहितीच्या आधारे उमेदवारांना ऑनलाईन परीक्षेस बसण्यास अनुमती देण्यात आली होती. तथापि, जाहिरातीमधील शैक्षणिक अर्हता, अनुभव व उमेदवारांनी ऑनलाईन अर्जामध्ये नमूद केलेल्या माहितीच्या आधारे पात्र उमेदवारांची निवड यादी यापूर्वी प्रसिध्द करण्यात आली आहे.

४) ऑनलाईन अर्जामध्ये नोंदविलेल्या नोंदीसंबंधी दस्तऐवज/दाखले छाननीकरीता सादर करणे सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवारांची आहे. ऑनलाईन अर्जामधील व जाहिरातीमधील अर्हतेबाबत नमूद केलेली कागदपत्रे ज्या दिवशी कागदपत्रांची पडताळणी करण्यात येईल त्या दिवशी उमेदवार आवश्यक कागदपत्रे सादर करु शकले नाहीत तर त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल आणि त्यास उमेदवार सर्वस्वी जबाबदार राहील.

५) जाहिरातीमध्ये नमूद केल्यानुसार ज्या उमेदवारांना अनुभवाची आवश्यकता असेल, अशा उमेदवारांनी अनुभवाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. जाहिरातीमधील अनुभवाची अर्हता पूर्णपणे सिध्द करण्याची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. अनुभवाच्या बाबतीत अनुभवाचे प्रमाणपत्र सिध्द करण्याकरीता अनुभवाबाबत इतर बाबींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

६) निवड झालेल्या उमेदवारांना नेमणुकीकरिता हक्क म्हणून सांगता येणार नाही. उमेदवाराची निवड ही जाहिरातीमध्ये नमूद करण्यात आलेल्या शैक्षणिक अर्हता, अटी व शर्तीच्या अधीन राहून तीन वर्षाचा कंत्राटी कालावधी यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर कंपनीच्या प्रचलित नियमानुसार "यंत्रचालक" या नियमित पदावर सामावून घेण्यात येईल.

७) **निवड प्रक्रिया ही मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल झालेली याचिका क्र. ९९४६/२०१९, मा. औद्योगिक कामगार न्यायालय, याचिका क्रमांक ४८/२०१२ व मा. उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद खंडपीठामध्ये याचिका क्र. २२३३८/२०१९, क्र. ९६७३/२०१९, क्र. ६४९६/२०१९, २७०१/२०२०, २७०३/२०२० व संलग्न याचिका तसेच मा. उच्च न्यायालय, मुंबई, नागपूर खंडपीठामध्ये दाखल झालेल्या याचिका क्र. ७०३८/२०१८, क्र. ५३१०/२०१९ व क्र. ५४२/२०१८ च्या आदेशाच्या/ निर्णयाच्या अधीन राहून करण्यात येत आहे.**

८) **शासन निर्णय दिनांक ०५/१२/२०१८ च्या अनुषंगाने मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या विशेष अनुमती याचिका क्र. १५७०१/२०१९ व सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक ०९/०९/२०२० च्या आदेशास अधीन राहून सर्व प्रवर्गातील उमेदवारांना, सामाजिक आणि शैक्षणिक मागास प्रवर्ग (एस.ई.बी.सी.) वगळून उमेदवारांची मंडलनिहाय यादी प्रसिध्द करण्यात येत आहे.**

९) **सदर पदाकरीताची सामाजिक आणि शैक्षणिक मागास प्रवर्गाची (एस.ई.बी.सी.) निवड व प्रतिक्षा यादी वैध राहील. सदरची रिक्त पदे भरण्यात येणार नसून ती बाजूला ठेवली जातील. सदरची निवड व प्रतिक्षा यादी मा.सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम आदेशानुसार कार्यान्वीत केली जाईल.**

१०) **निवड झालेल्या उमेदवारांचे दस्ताऐवज/कागदपत्रे छाननी केल्यानंतर जे उमेदवार पात्र होतील, अशा उमेदवारांना तीन वर्षाच्या निश्चित कालावधीकरिता कंत्राटी पध्दतीवर "उपकेंद्र सहाय्यक" म्हणून नेमणूक देण्यात येईल.**

**११) निवड झालेल्या उमेदवारांनी त्यांच्या ऑनलाईन अर्जामध्ये नोंदी/अर्हता संबंधिताच्या प्रमाणपत्रांची छाननी उमेदवारांना वर्ग करण्यात आलेल्या मंडलामध्ये दिनांक ०१-०२ डिसेंबर, २०२० रोजी सकाळी १०.०० वाजता करण्यात येईल. सोबत जोडण्यात आलेल्या मंडलनिहाय यादीमधील त्यांच्या नावासमोर नमूद केलेल्या मंडल कार्यालयामध्ये व नमूद केलेल्या तारखेला कागदपत्रे पडताळणीकरीता स्वत: हजर रहाणे अनिवार्य राहील. जे उमेदवार कागदपत्रे पडताळणीकरीता हजर राहणार नाहीत, अशा उमेदवारांची उमेदवारी रद्द समजली जाईल व त्यांच्याशी भविष्यात कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही अथवा त्यांच्या निवेदनाची दखल घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.**

१२) **कागदपत्र पडताळणी व नियुक्तीकरीता उमेदवारांना वर्ग करण्यात आलेल्या मंडल कार्यालयात कोणत्याही प्रकारचा बदल करण्यात येणार नाही. या संदर्भात उमेदवारांनी मंडल कार्यालयामध्ये बदल करणेबाबत कोणत्याही प्रकारचा प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष दबाव आणल्यास त्यांची निवड रद्द करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.**

१३) कागदपत्रे पडताळणी दिवशी जे उमेदवार उपस्थित असतील, अशा उमेदवारांची कागदपत्रांची तपासणी काही कारणास्तव पूर्ण न झाल्यास त्यांच्या कागदपत्रांची पडताळणी लगत पुढील दिवशी करण्यात येईल.

१४) उमेदवारांनी कागदपत्रे पडताळणीसाठी स्व: खर्चाने यावे लागेल आणि त्यांना कोणताही प्रवास खर्च/भत्ता दिला जाणार नाही.

१५) कोविड -१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी घ्यावयाच्या दक्षतेबाबत शासनाकडून मार्गदर्शक सूचना वेळोवेही निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. याबाबत उमेदवारांनी कागदपत्र पडताळणीच्या ठिकाणी सामाजिक अंतर राखणे (Social Distancing), मास्क लावणे, गर्दी न करणे इत्यादी मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे बंधनकारक राहील.

१६) **निवड झालेल्या उमेदवारांनी खाली दर्शविल्याप्रमाणे मूळ कागदपत्रे व स्वसाक्षांकीत केलेले छायांकीत प्रतींसहीत कागदपत्रे तपासणीसाठी हजर रहावे :-**

i) सिस्टीम जनरेटेड ॲप्लीकेशन ऑनलाईन फॉर्म. (ज्या उमेदवाराकडे ऑनलाईन अर्जाची प्रत उपलब्ध नाही अशा उमेदवारांना कागदपत्रे पडताळणीच्या ठिकाणी सदर ऑनलाईन अर्जाची प्रत उपलब्ध करुन देण्यात येईल.)

ii) एस.एस.सी. गुणपत्रक व प्रमाणपत्र.

iii) आय.टी.आय. प्रमाणपत्र (Electrician/Wireman)/सेंटर ऑफ एक्सलन्स (Electrical Sector) प्रमाणपत्र व राष्ट्रीय व्यवसाय प्रमाणपत्र इत्यादी.

iv) शिकाऊ उमेदवार अधिनियम-१९६१ अन्वये राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी पूर्ण झाल्यानंतर वीजतंत्री/तारतंत्री व्यवसायातील अथवा सेंटर ऑफ एक्सलन्स (Electrical Sector) मधील राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCTVT) नवी दिल्लीकडून देण्यात येणारे प्रमाणपत्र.

v) राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी पूर्ण झाल्यानंतर संबंधित वीजतंत्री/तारतंत्री व्यवसायातील अथवा इलेक्ट्रीकल सेक्टरमधील विद्युत क्षेत्रातील ०२ वर्षाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र.

vi) जर तदर्थ मंडळ/महावितरण/महापारेषण/महानिर्मिती कंपनीमध्ये वीजतंत्री/तारतंत्री व्यवसायातील शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण पूर्ण केले असेल अशा उमेदवारांचा प्रशिक्षणाचा कालावधी अनुभव म्हणून ग्राह्य धरण्यात येईल. तथापि, उमेदवारांनी शिकाऊ उमेदवारी कालावधी व अनुभवाचा कालावधी एकूण ०२ वर्षाचा असणे आवश्यक आहे.

vii) जातीचे प्रमाणपत्र.

viii) जातीचे वैधता प्रमाणपत्र (वैधता प्रमाणपत्र नसलेल्या उमेदवारांनी जाती वैधताबाबतची सोबत जोडलेल्या यादीतील नमूद केलेले कागदपत्रे सादर करावी.)

ix) समांतर आरक्षणाच्या पृष्टयर्थ सक्षम प्राधिकाऱ्याकडून विहित केलेले प्रमाणपत्र. उमेदवारांनी एक किंवा एकापेक्षा जास्त समांतर आरक्षणाची नोंद ऑनलाईन अर्जामध्ये केली असल्यास तशी सर्व प्रमाणपत्रे कागदपत्र पडताळणीवेळी सादर करणे आवश्यक आहे.

x) प्राविण्यप्राप्त खेळाडू व्यक्तींसाठी असलेल्या आरक्षणाचा दावा करणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत शासन निर्णय दिनांक १८/०८/२०१६ अन्वये क्रीडा विषयक विहित अर्हता धारण करीत असलेबाबत सक्षम प्राधिकाऱ्याने खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र कागदपत्रे पडताळणी दिवशी सादर करणे अनिवार्य आहे, अन्यथा सदर उमेदवाराची उमेदवारी रद्द करण्यात येईल.

xi) अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)

xii) सक्षम प्राधिकाऱ्यांनी निर्गमित केलेले नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र.

*****

**सोबत : -**

**मंडलनिहाय निवड यादी**

**दिनांक : २४/११/२०२०**